प्रा. अ. भि. शहा

नवीन महाराष्ट्राचें राजकारण

नवभारत मासिकाच्या मे १९६० च्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या प्रस्तुत लेखकाच्या लेखावर टीका म्हणून श्री. ' चिकित्सक ' आणि श्री. पन्नालाल सुराणा यांचे लेख अनुक्रमे जुलै आणि ऑगस्ट या दोन अंकांत आले आहेत. त्यांत उपस्थित केलेल्या कांहीं मुद्यांच्या अनुषंगानें हा लेख लिहिला आहे. ' कांहीं मुद्दे ' म्हणण्याचें कारण असें कीं असे प्रश्न केवळ चर्चेनें संपूर्णतः कधींच सुटूं शकत नाहींत. अशा परिस्थितींत चर्चेचा उद्देश एक दुसऱ्यांचे दृष्टिकोण पूर्वग्रह न ठेवतां समजून घेणें, आणि शक्य झाल्यास अधिकाधिक विचारवंतांना मान्य होईल असा मार्ग सुचविणें एवढा होय. परंतु मनुष्याचा स्वभाव विकारशील आहे, आणि म्हणून चर्चा एकदां सुरू झाली कीं ती शेवटपर्यंत पूर्वग्रहरहित राहील अशी हमी कोणी देऊं शकणार नाहीं. बरें, पूर्वग्रह टाळतां आला तरी मनुष्याचें, आणि त्यांतल्यात्यांत विचार करूं पाहणाऱ्या मनुष्याचें, संस्कारवैविध्य लक्षांत घेतलें तर प्रत्येक वादांतून सर्वमान्य सत्य सांपडेल अशी आशा बाळगणें चुकीचें होईल. याचा अर्थ वाद करूं नये असा नव्हे; परंतु वादांत उपस्थित केले जाणारे सर्व मुद्दे लक्षांत घेण्याचें प्रयोजन नाहीं. प्रस्तुत बाबतींत तर हें विधान नेहमींपेक्षा अधिक लागूं पडतें. कारण कीं श्री. ' चिकित्सक ' यांनीं माझ्या मूळ लेखाला धरून लिहिलें आहे; परंतु त्यांची भाषा श्री. सुराणा म्हणतात तशी कांहीं ठिकाणीं ' नको इतकी तिखट ' आहे इतकेंच नव्हे तर एका विशिष्ट मर्यादेचें उल्लंघन न करतां त्यांच्या आक्षेपांना उत्तर देणें अवघड आहे. श्री. सुराणा यांचा लेख गंभीर चर्चेला साजेसा आहे, परंतु त्याचा बराच भाग माझ्या मूळ लेखाशी असंबद्ध आहे. म्हणून त्यांनीं उपस्थित केलेले काही मुद्दे जरी महत्त्वाचे असले तरी त्यांच्यावर येथें लिहिणें अप्रस्तुत ठरेल.

अगोदर श्री. ' चिकित्सक ' यांचा लेख घेऊं. श्री. ' चिकित्सक ' हे राजकारणापेक्षां भाषेचे चिकित्सक असावेत असा त्यांचा लेख वाचून ग्रह होतो, दुर्दैवानें त्या दृष्टीनेंहि त्यांनीं माझ्यावर अन्याय केला आहे असें म्हणणें भाग आहे. उदाहरणार्थ, " परंतु पितरांच्या पापांकरितां मुलांना शिक्षा देणें लोकशाही मूल्यांना धरून होणार नाही " या माझ्या विधानाचा उल्लेख करून ते लिहितात कीं, " म्हणजे पितरांनीं केवळ पापें केलीं हें गृहीत धरलें. " (जाड ठसा मुळांत.) हें कसें काय तें लक्षांत येत नाही. " श्री. ' चिकित्सक ' यांनीं माझ्या एका मराठी वाक्यांतून नसलेला अर्थ काढला, " या विधानाचा अर्थ केवळ एका मराठी वाक्यांतून चुकीचा अर्थ काढण्यापलीकडे त्यांनीं कांहीं केलें नाहीं, असा होईल असें वाटत नाहीं. परंतु मराठी भाषेबद्दल बोलण्याचा अधिकार श्री. ' चिकित्सक ' यांचा असल्यामुळें त्याविषयीं मी जास्त लिहिणें चुकीचें ठरण्याचा संभव आहे. आपल्या लेखांत अशा बऱ्याच चुका श्री. ' चिकित्सक ' यांनीं केल्या आहेत, एवढें सांगून हा मुद्दा येथेंच सोडून देतो.

श्री. ' चिकित्सक ' यांनीं केलेला दुसरा अन्याय म्हणजे माहितीच्या अभावीं त्यांनीं सूचित केलेला संधिसाधुपणाचा आरोप होय. " मुंबई महाराष्ट्राचें सांस्कृतिक शक्तिकेंद्र आहे, " हें माझें विधान घेऊन त्यांनीं शेरा दिला आहे कीं " हें वाक्य १९५६ सालीं लिहिलें जावयास पाहिजे होतें ! " सुदैवानें अशा अर्थाचें वाक्य मी १९५६ सालीं लिहिलें होतें. श्री. ' चिकित्सक ' यांच्या माहितीसाठीं तें संबंध वाक्य खालीं देत आहे :

" It is not merely a question of recognizing Maharashtra's claim over Bombay and playing fair with her. What is equally important is the

अनुक्रमणिका

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

political and cultural significance of Bombay for Maharashtra as well as for India as a whole ...... (Bombay) is also a nerve-centre of much that is progressive in the life of the nation. It is suicidal to convert it into a Hongkong or a New Delhi. "

हीं वाक्यें माझ्या " Satyagraha and Democracy या लेखांतून घेतलेलीं आहेत. हा लेख एका सुप्रसिद्ध इंग्रजी नियतकालिकांत १९५६ सालीं आक्टोबर अंकांत प्रसिद्ध झाला होता. अर्थात् श्री. 'चिकित्सक' यांना ही माहिती असावयास पाहिजे होती असें नाहीं. परंतु इंग्रजींत ज्याला 'लोडेड्' (loaded) म्हणतात असें विधान कोणत्याहि, किमान जिवंत असलेल्या, व्यक्तीबद्दल करतांना थोडी काळजी घेतली पाहिजे; तसें न केल्यास विधानकर्ता स्वतःच्या अभिरुचीबद्दलच नव्हे तर स्वतःच्या जबाबदारीच्या जाणीवेबद्दलहि संशयास कारण देतो, असें सुचवावयाचें आहे. ही झाली चिकित्सकवृत्तीच्या अभावाची गोष्ट. येथें दुसराहि एक मुद्दा उपस्थित करणें आवश्यक वाटतें. १९५६ सालीं वर उद्धृत केलेलें विधान मी केलें नसतें तर काय झालें असतें ? १९६० सालीं केलेल्या विधानाची सत्यासत्यता किंवा योग्यायोग्यता ठरविण्यांस या गोष्टीचा काय उपयोग होऊं शकतो ? कोणतेंहि विधान केव्हां तरी पहिल्यांदां केलें जात असतें. तें अगोदर अमक्या वेळीं कां केलें गेलें नाहीं, असा प्रश्न एका विशिष्ट अर्थानें उपस्थित केला जाऊं शकतो हें मला माहिती आहे. परंतु अनेकदां अशा प्रश्नामागची मनोवृत्ति निर्कोप नसते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तथापि आपल्या सामाजिक जीवनाचें हें दुर्दैव आहे कीं अनेक सुशिक्षित माणसें अशी मनोवृत्ति दाखवितात. श्री. 'चिकित्सक' यांच्या लेखांत ही वृत्ति अनेक ठिकाणीं स्वैरविलास करतांना आढळते : उदाहरणार्थ, जेथें कठोर आत्मपरीक्षणाची गरज आहे तेथें दुसऱ्यांच्या माथीं खापर फोडून मोकळें होण्यास लागणाऱ्या वाक्चातुर्यानें ते समाधान मानून घेतात : ",महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाच्या सर्व नाड्या" आपल्या काबूंत ठेवणारे "महाराष्ट्रीयेतर भांडवलदार," "राष्ट्रीय वसाहतवाले," इत्यादि शब्दप्रयोग टाळ्या मिळविण्यासाठीं ठीक आहेत; महाराष्ट्रीय समाजाच्या हाडामांसांत पसरलेल्या जातीयवादाच्या व्याधीचें निदान करण्यास आणि त्यावर उपाय शोधून काढण्यास त्यांचा कांहींहि उपयोग नाहीं.

अन्यायाचे वर उल्लेख केलेले दोन प्रकार श्री. 'चिकित्सक' यांनीं केलेल्या तिसऱ्या प्रकारापुढें प्रेमाचे आणि सौजन्याचे वाटतात. हा तिसरा प्रकार म्हणजे प्रतिपक्ष्यावर बौद्धिक अप्रामाणिकतेचा आरोप करणें हा होय. आरोपाचें स्वरूप गंभीर असल्यामुळें माझें मुळांतलें विधान आणि श्री. 'चिकित्सक' यांची टीका थोड्या विस्तारानें देणें आवश्यक आहे.

माझें मूळ विधान असें आहे : "राजकीय सत्तेच्या जोरावर ... मराठ्यांचें संपूर्ण आधिपत्य नसलें तरी त्यांचें वर्चस्व निर्माण होईल—असें (ब्राह्मणांना वाटणाऱ्या) या भीतीचें स्वरूप आहे. ब्राह्मणसमाजाचा अहंकार, त्याची जातीय वृत्ति आणि ब्राह्मणेतरांवर त्यानें शतकानुशतकें गाजवलेली सत्ता, इत्यादि दोष मान्य करणाऱ्या सुशिक्षित आणि बुद्धिमान् ब्राह्मण विचारवतांनाहि महाराष्ट्राच्या समाजपुरुषाच्या रोगाचा हा परिणतिक्रम (Prognosis) मान्य आहे. मात्र ते असें म्हणतात कीं असें होणें अनिवार्य आहे; कांहीं वर्षे ब्राह्मणांनीं अज्ञातवासांत काढलीं पाहिजेत; त्यांनीं आपल्या पूर्वजांच्या किंवा आपल्या पापांचें प्रायश्चित भोगलें पाहिजे" यावर श्री. 'चिकित्सक' यांची टीका अशी आहे : "ब्राह्मणसमाज अहंकारी व जातीय वृत्तीचा आहे. त्यानें ब्राह्मणेतरांवर शतकानुशतकें सत्ता गाजविली असे त्याचे दोष असल्यामुळें त्याच्यावर आज ओढवूं घातलेलें संकट क्रमप्राप्त आहे' असें सरळ न लिहितां व विधानाची जबाबदारी स्वतःवर न घेतां... **आरोप करण्याची जबाबदारी अस्तित्वांत नसलेल्या ब्राह्मण विचारवंतांच्याच गळ्यांत बांधून विधानाच्या जबाबदारींतून आपण बाजूस राहावयाचें व परिणतिक्रम मान्य आहे या निर्णयास उचलून धरण्यास हळूंच बोट पुढें करावयाचें या वक्ररचनेंतूनच तटस्थतेच्या भूमिकेला किंचित् ढळ पोहोचतो.**" (जाड ठसा माझा)

श्री. 'चिकित्सक' यांनीं केलेला आरोप दोन भागांत आहे. पहिला भाग म्हणजे ब्राह्मणसमाजाचे पूर्वीचे किंवा आजचे दोष स्वतःच्या नांवानें न सांगतां ते मी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
अनुक्रमणिका

दुसऱ्याच्या तोंडातून वदवून घेतले आहेत; दुसरा आरोप म्हणजे हे दोष ज्यांच्या तोंडातून वदवून घेतले आहेत ते लोक अस्तित्वांत नसलेले ब्राह्मण विचारवंत आहेत. पहिला आरोप भाषिक स्वरूपाचा आहे. मूळ लेख बाळबोध मराठींत लिहिला गेला असता तर श्री. 'चिकित्सक' यांना मी कांहीं विधानें स्वतःच्या नांवानें करावयाचें टाळूं पहात आहे असें वाटलें नसतें. परंतु ज्याअर्थी त्यांनीं शंका उपस्थित केली आहे त्याअर्थी येथें स्पष्ट केलें पाहिजे कीं माझ्या लेखांत उल्लेख केलेले दोष खरोखरच त्यांच्यांत आहेत (किंवा 'होते'—वेगवेगळया दोषांना वेगवेगळा 'काळ' लागू पडेल म्हणून हा वैयाकरणिक विकल्प योजिला आहे, निःसंदिग्ध विधान करण्याची जबाबदारी टाळण्याकरितां नव्हे) असें माझें मत आहे. "ब्राह्मणांचे दोष कमी अधिक प्रमाणांत प्रत्येक जाति स्वतःपेक्षां कनिष्ठ जातींशीं वागतांना दाखवीत आहे" हें माझें विधान श्री. 'चिकित्सक' यांना एकापेक्षा अधिक दृष्टीनें पुरेसें वाटावयास पाहिजे होतें.

श्री. 'चिकित्सक' यांचा दुसरा आरोप गंभीर स्वरूपांचा आहे, परंतु तोहि चुकीचा आहे. महाराष्ट्राच्या गेल्या बारा वर्षांच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासाची थोडीशी आठवण असलेल्यानें असा आरोप केला नसता. मला अभिप्रेत असलेल्या ब्राह्मण विचारवंतांचीं नांवें येथें देत नाहीं त्याचें कारण ते अस्तित्वांत नाहींत म्हणून नव्हे, तर त्यांची इच्छा माहीत नसतांना त्यांना वादांत ओढून घेणें योग्य होणार नाहीं म्हणून. श्री. 'चिकित्सक' यांच्या समाधानाकरितां एवढेंच सांगतो कीं या विचारवंतांत जातीच्या दृष्टीनें चित्तपावनांपासून कऱ्हाड्यांपर्यंतचे, आणि राजकीय मतांच्या दृष्टीनें मार्क्सवाद्यांपासून कॅांग्रेसवाद्यांपर्यंतचे ब्राह्मण आहेत; तसेंच त्यांच्यांत अर्थशास्त्रज्ञहि आहेत आणि प्राच्यविद्याविशारदहि आहेत; राजकीय पुढारीहि आहेत आणि महाविद्यालयीन प्राध्यापकहि आहेत. त्यांची संख्या लहान आहे हें खरें, परंतु हें स्वाभाविक आहे. ही संख्या मोठी असती तर महाराष्ट्राच्या जातिवादाचा प्रश्न लवकरच सुटण्याच्या मार्गास लागला असता, आणि **नवभारत** मासिकांत हा वाद सुरूंहि झाला नसता.

श्री. 'चिकित्सक' यांनीं घेतलेले बरेचसे आक्षेप माहितीचा अभाव, भाषिक गैरसमज, राग आणि तद् जन्य बौद्धिक निष्काळजीपणा यांतून निर्माण झालेले आहेत; म्हणून त्यांचा अधिक विस्तारानें विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. उरलेल्यापैकीं एकदोन महत्त्वाच्या आक्षेपांचें निराकरण करण्याचा प्रयत्न करून त्यांच्या लेखास प्रत्युत्तर संपवितो.

श्री. 'चिकित्सक' लिहितात कीं : "प्रा. शहांनीं केलेला विचार सर्वांग परिपूर्ण नाहीं ... महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचीं सर्व अंगें लक्षांत घेऊन ... समान वाटपाचा विचार झालेला नाही." हा आक्षेप अनाठायीं आहे, असें वाटतें. कारण कीं माझ्या मूळ लेखाच्या सुरुवातीस त्याच्या कक्षा मी स्पष्टपणें विशद केल्या होत्या; त्या अशा होत्या : "(ब्राह्मणांना वाटणाऱ्या) या भीतीचें स्वरूप, तिचा पारिस्थितिक (empirical) संदर्भ, आणि नवीन महाराष्ट्राच्या विकासावर तिचे होणारे परिणाम—यांचा येथें थोडक्यांत विचार करण्याचें ठरविलें आहे." केवळ आर्थिक उपायानें जातीयवादाचा प्रश्न सुटूं शकेल असें मला वाटलें असतें तर "महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचीं सव अंगें लक्षांत घेऊन समान वाटपाचा विचार" करण्याचा प्रयत्न मी केला असता. परंतु श्री. 'चिकित्सक' यांना वाटतें कीं "आर्थिक समतेचा प्रश्न सुटला कीं सारे कलह आपोआप मिटतील", कारण कीं त्यांच्या मतें "कलहाचीं मुळें प्रथमतः आर्थिक विषमतेंत असतात". समतेचें मूल्य मान्य असणाऱ्यानांहि, ते कम्युनिस्ट नसले तर त्यांना, हीं विधानें मान्य होतील कीं नाहीं याबद्दल शंका आहे. सामाजिक जीवनाचे प्रश्न इतके सोपे असते तर फार बरें झालें असतें. परंतु सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाच्या प्रश्नांचीं मुळें यापेक्षा अधिक खोल असतात. जातीयवादाचा प्रश्नहि अशांतला आहे असें माझें मत असल्यामुळें सर्वमान्य आणि सर्वप्रिय परंतु प्रस्तुत विषयाशीं असंबद्ध असणाऱ्या आर्थिक गोष्टींचा विचार मी मूळ लेखांत केलेला नाहीं.

शेवटीं एक स्पष्टीकरण श्री. 'चिकित्सक' म्हणतात कीं, "ब्राह्मणेतरांना प्रशासकीय क्षेत्रांत नोकऱ्या कशा द्याव्यात ह्याविषयीं प्रा. शहांनीं जी रीत सुचविली आहे ती व्यक्तिस्वातंत्र्याच्या, मानवतेच्या व व्यापक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

नीतीच्या तत्त्वास हरताळ फासणारी आहे." माझें मूळ विधान "नियुक्त कार्य समाधानकारकरीत्या करण्याकरितां लागणारे किमान गुण असलेल्या" ब्राह्मणेतर उमेदवारां-बद्दल आहे; तसेंच "गुण आणि कार्यक्षमता यांच्या किमान अटी कधींहि बाजूला सारतां कामा नयेत"; आणि, "एकदां नेमणूक झाल्यानंतर नोकरींत बढती इत्यादि गोष्टी केवळ योग्यतेवर अवलंबून असावयास पाहिजेत"—असे दोन संकेत सांगितले आहेत. या विधानांमागील भूमिका लोकशाही मूल्यांना मारक आहे असें मला अजून तरी वाटत नाहीं. उलट, समाजाच्या वंचित घटकांना आतांपर्यंत न मिळालेल्या संधी उपलब्ध करून देऊन लोकशाही मूल्यांची व्याप्ति वाढविण्यास मदत व्हावी, आणि स्फोट होऊन लोकशाही मूल्यांवरच नव्हे तर व्यापक नीतितत्त्वांवरहि आघात होऊं नये, अशा प्रकारची ही भूमिका आहे. एक गोष्ट मात्र लक्षांत घेतली पाहिजे : आर्थिक क्षेत्रांत अनिर्बंध कृतिस्वातंत्र्य (laissez faire) आणि 'योग्यतमाचा टिकाव' (survival of the fitest) या तत्त्वांचा आज लोकशाहीच्या दृष्टीनें कोणी आग्रह धरत नाहीं. सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतहि या तत्त्वांचें पुनः परीक्षण होणें आवश्यक आहे, असें येथें सुचवावयाचें आहे. तसें न झाल्यास आज जे मागासलेले आहेत ते कायमचे तसेच राहण्याचा संभव आहे. येथें आर्थिक समतेचा प्रश्न नाहीं. उलट ज्या समाजांत सामाजिक आणि सांस्कृतिक समता वा अभिसरण नसतें त्यांत आर्थिक समता एकदा प्रस्थापित झाली तरी टिकाऊ ठरण्याचा संभव कमी आहे. कम्युनिस्ट राष्ट्रांचा अनुभव या बाबतींत फार उद्बोधक आहे.

वर सुचविलेलें पुनःपरीक्षण करून नवीन तत्त्वें स्वीकारतांना कोणते संकेत काटेकोरपणानें पाळले पाहिजेत यांचा उल्लेख नुकताच आला आहे, म्हणून त्यांची येथें पुनरुक्ति करण्याची आवश्यकता नाहीं.

श्री. सुराणा यांचें बरेंचसें विवेचन तात्त्विक पातळीवरचें आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेल्या जातींना लवकर पुढें येण्यास मीं केलेल्या विशिष्ट सूचनांबद्दल त्यांनीं जवळ जवळ कांहीं म्हटलेलें नाहीं. म्हणून त्यांच्या लेखांत उपस्थित झालेले परंतु मार्गे न आलेले कांहीं मुद्दे यापुढें चर्चेस घेतो.

भारतीय राजकीय संदर्भाचें विश्लेषण करतांना श्री. सुराणा यांनीं केलेलें कॉंग्रेसचें मूल्यमापन कांहीं अंशीं वरपांगी आहे असें वाटतें. हें विधान करतांना कॉंग्रेसच्या दोषांवर पांघरूण घालण्याची इच्छा नाहीं. हे दोष सर्वश्रुत आहेत आणि कॉंग्रेसवालेहि ते नाकारीत नाहींत. प्रश्न आहे तो या दोषांचीं कारणें कोणतीं याबद्दलचा. श्री. सुराणा यांच्या मतें कॉंग्रेस हा "समाजांतील धनवंत, प्रतिष्ठित व जातीच्या दृष्टीनें बहुसंख्य वर्ग" यांचा पक्ष आहे आणि यांत तिच्या दोषांचीं मूळें सांपडतील. याचा अर्थ असा होईल कीं कॉंग्रेसचें राजकीय आणि आर्थिक धोरण वर उल्लेख केलेल्या वर्गांच्या हिताचें आहे व राहील, आणि त्याकरितां समाजवादी तत्त्वांना मुरड घालावी लागली किंवा त्यांचा त्याग करावा लागला तरी कॉंग्रेस तें करील. येथें दोन प्रश्न उपस्थित होतात. एक असा कीं धनवंत-प्रतिष्ठित वर्ग आणि जातीच्या दृष्टीनें बहुसंख्य वर्ग यांचीं हितें एकसारखीं नसलीं तरी एक दुसऱ्यांना अविरोधी आहेत काय ? दुसरा प्रश्न असा कीं, स्वातंत्र्योत्तर काळांत कॉंग्रेसचें धोरण धनवंत-प्रतिष्ठितांना किंवा एका विशिष्ट जातीला विशेष अनुकूल असें राहिलें आहे काय ? मला वाटतें, दोन्हीं प्रश्नांचें उत्तर नकारात्मक द्यावें लागेल. या विधानाची विस्तृत चर्चा करणें मूळ विषयाला धरून होणार नाहीं, म्हणून त्याच्या समर्थनार्थ केवळ कांहीं ढोबळ गोष्टींकडे लक्ष वेधून समाधान मानणें भाग आहे.

अगोदर कॉंग्रेसचें आर्थिक धोरण घेऊं. एका रात्रींत आयुर्विमा कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण, नियोजनांत शासकीय विभागाला दिलें जाणारें महत्त्व, चुकीच्या स्वरूपांत कां असेना पण सहकारी शेतीवर दिला जाणारा भर, हळू का असेना परंतु जमीनदारीचें होत असलेलें उच्चाटन, कारभाराच्या विकेंद्रीकरणास दिलेली मान्यता आणि त्या दिशेनें सुरू झालेले प्रयत्न, कामगार कल्याण विषयक कायदे—या गोष्टी धनवंत—प्रतिष्ठितांच्या पक्षानें मान्य तरी केल्या असत्या का ? दुसरें असें कीं कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेतृगणांत मार्क्सच्या अर्थानें बुर्झ्वाजी-(bourgeoisie) चे प्रतिनिधी म्हणतां येतील असें किती लोक सांपडतील ? आणि कम्युनिस्टांचे किंवा जनसंघाचे सहप्रवासी किती सांपडतील ?

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
अनुक्रमणिका

कॉंग्रेसचें राजकीय धोरणहि विविधलक्षी आहे. त्यांत लोकशाही आहे, समाजवाद आहे, साम्यवाद आणि हिंदुत्ववादाचीं बीजेंहि आहेत. प्रजा-समाजवाद्यांपेक्षां कम्युनिस्टांना अधिक जवळचे समजणारे आणि कम्युनिस्टांच्या सावलींतहि उभे न राहणारे; विनोबांना प्रणाम करून बेसिक शिक्षणाची महती गाणारे आणि खरकपूर व पवई यांची स्थापना करणारे; भारत धर्मातीत राज्य आहे म्हणून अभिमान बाळगणारे आणि आणि राज्यसरकारतर्फे फल ज्योतिषशास्त्राला पुनर्जीवन देणारे आणि हिंदुधर्मविधि अनुसार सार्वजनिक पूल, इत्यादींचें उद्घाटन करणारे— असे सर्व प्रकारचे लोक कॉंग्रेसचें धोरण ठरविणाऱ्या नेतृवर्गांत आढळतात. आढळत नाहीं तो भांडवलदारांचा किंवा मोठ्या जमीनदारांचा प्रवक्ता म्हणून ओळखतां येईल असा गट.

जातीच्या दृष्टीनेंहि कॉंग्रेस बहुसंख्य असलेल्या वर्गाचा पक्ष एका मर्यादित अर्थानेच होऊं शकतो.[१] श्री. सुराणा यांनीं दिलेल्या उदाहरणांत संख्याप्रमाणें नसल्यामुळें त्यांच्या विधानांतून विश्वासार्ह निष्कर्ष काढणें कठिण आहे, जे कांहीं आंकडे मला माहीत आहेत त्यावरून त्यांच्या विधानाला पुष्टि मिळेल असें वाटत नाहीं. उदाहरणार्थ, महाराष्ट्रांत मराठा जात एकूण लोकसंख्येच्या ३० टक्के भरते, हें माझ्या मूळ लेखांत आलेंच आहे. केरळमध्यें येळवा जात २५ टक्क्याच्या आसपास आहे आणि ती कॉंग्रेसपेक्षा कम्युनिस्ट पक्षाच्या मागेंच अधिक आहे. राजस्थानांत जाट आणि राजपूत लोकसंख्येच्या ९ टक्के आणि ६ टक्के आहेत.[२] हे आकडे श्री. सुराणा यांच्या विधानास पोषक नाहींत.

मग कॉंग्रेसचे दोष येतात तरी कोठून ? मला वाटतें कीं त्यांचें मूळ तिच्या बहुरंगी, विविधलक्षी स्वरुपांत आणि ऐतिहासिक पार्श्वभूमींत शोधलें पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय ग्रामीण जनतेला पहिल्यांदा देशाच्या राजकारणावर आपला प्रभाव पाडण्याची संधि मिळाली, ही वस्तुस्थितिहि कॉंग्रेसचें स्वरूप पालटण्यास जबाबदार आहे. हें चांगलें झालें कीं वाईट, हा प्रश्न नाहीं; कारण कीं सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या हक्कावर उभारलेली लोकशाही समाजरचना निर्माण करावयाचें ठरविल्यावर कांहीं गोष्टी घडणें क्रमप्राप्त आहेत. परंतु याचा परिणाम असा झाला कीं स्वातंत्र्यपूर्व काळांत सुशिक्षित नागर मध्यमवर्गाचें नेतृत्व असलेली कॉंग्रेस हळूहळू ग्रामीण मध्यमवर्ग आणि शेतकरी यांच्या पक्षांत राज्यसरकारच्या पातळीवर रूपांतर पावूं लागली. अखिल भारतीय पातळीवर कॉंग्रेसचें नेतृत्व अजून नागर मध्यमवर्गाचें आहे. परंतु प्रांतिक कॉंग्रेस कमेट्या आतां बऱ्याच ठिकाणीं त्याच्या हातांतून गेल्या आहेत, आणि म्हणून नागर मध्यमवर्ग कॉंग्रेसमधून बाहेर पडला आहे. या वर्गानें कोणत्याहि देशांत आतांपर्यंत ग्रामीण समाजाचें नेतृत्व किंवा वर्चस्व मान्य केलेलें दिसत नाहीं. त्याचा व्यवहार एकतर फार हिशोबी असतो, नाहींतर स्वप्नाळू ध्येयवादाचा असतो.[३] सांस्कृतिक दृष्ट्या समाजांत सर्वांत अधिक प्रगत असल्यामुळें या वर्गाला सामाजिक अन्याय, सार्वजनिक जीवनांत पदोपदीं दिसत असलेली अनैतिकता, इत्यादींची त्याला चीड येते आणि पददलितांच्या आदर्श समाजाचीं स्वप्नें तो उराशीं बाळगतो. परंतु क्रान्तिकारकाला अभिप्रेत असलेला सर्वगुणसंपन्न बहुजनसमाज अजून अस्तित्वांत यावयाचा आहे. म्हणून एकदा क्रान्ति झाली आणि बहुजनाच्या 'खऱ्याखुऱ्या' प्रतिनिधींच्या हातांत सत्ता गेली कीं लवकरच या वर्गाचा भ्रमनिरास होतो. शहर आणि खेडीं यामधलें सांस्कृतिक अंतर अजिबात नाहींसें होणें अशक्य आहे. परंतु हें अंतर आजच्यापेक्षा फार

---

१. जात ही राज्यसरकारच्या पातळीवर प्रभावी असलेली संस्था आहे, केंद्र सरकारपर्यंत तिचा प्रभाव पोहोंचत नाहीं, हें मान्य होईल असें येथें गृहीत धरलें आहे.

२. गुजरातमध्यें जातीयवादाचा प्रश्न नसल्याचें कारण श्री. 'चिकित्सक' यांना वाटतें तसें आर्थिक नसून वेगळें आहे.

आंध्र, तामीळनाड, कर्नाटक, बिहार, इत्यादि राज्याची आंकडेवार माहिती येथें उपलब्ध नसल्यामुळें त्यांच्याबद्दल या घटकेस कोणतेंहि निश्चित विधान करणें शक्य नाहीं.

३. याला अपवाद असतात हें वेगळें सांगावयास नको.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
अनुक्रमणिका

कमीं होत नाहीं तोपर्यंत ग्रामीण समाजाचें प्रतिनिधित्व करणाऱ्या कोणत्याहि पक्षाचें सरकार सुशिक्षित नागर मध्यमवर्गाला 'आपलें' म्हणून वाटणार नाहीं. हें विधान आर्थिक हितसंबंधाच्या निरपेक्ष आहे; आर्थिक हितसंवाद असूनहि सांस्कृतिक संघर्ष किंवा दुरावा असूं शकतो. सांस्कृतिक अंतराबरोबर आर्थिक हितसंघर्ष आणि सामाजिक विरोध असले तर परिस्थिति अधिकच असमाधानकारक होणार हें स्वाभाविक आहे.

या विषयावर इतक्या विस्तारानें लिहिण्याचें कारण असें कीं मार्क्सचा आर्थिक नियतिवाद अमान्य करणारे विचारवंतहि आपल्याकडील राजकीय पक्षांचें आणि चळवळीचें विश्लेषण करतांना मार्क्सवादी विचार पद्धतीच्या चाकोरीतून बाहेर पडूं शकत नाहीं असें अनेकदां आढळतें. येथें आर्थिक हितसंबंधांचें अवमूल्यन करण्याचा उद्देश नाहीं. परंतु व्यक्ति जशी केवळ अर्थप्रधान व्यक्ति (Economic man) नसते तसेंच सामाजिक जीवन म्हणजे केवळ आर्थिक संबंधांचें जाळें नसतें. आर्थिक कारणें अनेक बाबतींत महत्त्वाचीं असलीं तरी त्यांचें महत्त्व नेहमीं निर्णायक स्वरूपाचें असतें असें नाहीं. मार्क्सवाद धर्म म्हणून समजला जाणाऱ्या देशांचा अनुभवहि हेंच दाखवितो कीं आर्थिक नियतिवाद हा एक फार एकांगी आणि म्हणून फसवा सिद्धान्त आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या स्वरूपाचें वेगळें विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं. तिचे दोष नाकारण्याची किंवा तिचा बचाव देण्याची, आणि तें शक्य नसल्यास त्यांच्या निर्मूलनासाठीं प्रयत्न करण्याची प्रत्यक्ष जबाबदारी त्या पक्षाच्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची आहे. परंतु अशा प्रयत्नांस मदत करण्याची जबाबदारी या राज्यांतल्या प्रत्येक लोकशाहीप्रेमी विचारवंताची आहे. कारण काँग्रेस ही एका अर्थानें भारतीय समाजाचें लहानसें प्रातिनिधिक चित्र आहे, आणि म्हणून या समाजाचे सर्व अंतर्विरोध, सर्व दोष त्या पक्षांत प्रकर्षानें दिसत आहे. काँग्रेसचे दोष तिच्या विशिष्ट धोरणांतून उत्पन्न झालेले नसून उलट तिचें धोरण हेंच अनेकदां भारतीय समाजाच्या सर्वांगीण अपरिपक्वतेचे प्रतिबिंब असतें, हें पाहण्याकरितां गेल्या तीन वर्षांत जेथें जेथें काँग्रेसविरोधी पक्ष किंवा आघाड्या सत्तेवर होत्या त्यांच्या कारभाराचा अभ्यास केला पाहिजे. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास असें दिसून येईल कीं ग्रामीण विभागांत काँग्रेस आणि तिचे डावे विरोधक यांच्या कारभारांत फरक सांगणें अवघड होतें. नागर विभागांत तर विरोधकांनीं काँग्रेसवरहि मात केलेली दिसून येते. क्रान्तिकारक अभिनिवेशानें सत्ताग्रहण करणाऱ्या समाजवादी पक्षांना किंवा आघाड्यांना इतक्या लवकर अनेक अनिष्ट प्रवृत्तींशी तडजोड करावी लागत असेल तर त्याचें कारण पक्षांचे कार्यक्रम आणि विचारप्रणाली यांच्यापेक्षां त्या सर्वांच्या मागें असलेल्या बहुजनसमाजाच्या परंपरागत कुंभकर्णीय जाड्यांत शोधलें पाहिजे. आणि म्हणून काँग्रेसचे किंवा इतर कोणत्याहि लोकशाही पक्षाचे दोष दूर करण्यास राजकीय विरोध अपुरें साधन आहे. भारतीय जनतेबद्दल स्वतःला वाटणारें प्रेम तिला खरोखर हितप्रत व्हावें अशी इच्छा बाळगणाऱ्यांनीं प्रसंगीं कटुता पतकरूनहि तिला लोकशाहीचें शिक्षण देण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. हें काम दीर्घमुदतीचें आहे. तसेंच तें केवळ सरकार किंवा राजकीय पक्ष यांना शक्य होणारें नाहीं; परंतु त्यांच्या सहकाराशिवायहि तें सफल होणें सोपें नाहीं. ध्येयवादी सुशिक्षितांनाहि हें कार्य म्हणजे एक मोठें आव्हानच आहे.

ब्राह्मणब्राह्मणेतर वादाच्या अनुषंगानें, "सूडाची भाषा जितकी चुकीची आहे तितकीच प्रायश्चित्ताची भाषाहि अयोग्य आहे" हें मला मान्य आहे. परंतु येथें प्रश्न आहे तो सूड किंवा प्रायश्चित्त घेण्याचा नसून आतांपर्यंत अन्याय झालेल्यांचा विश्वास संपादन करण्याचा आहे. ब्राह्मणसमाजाच्या हातांतून सत्ता जाऊं लागल्यापर्यंत त्याची वागणूक या दृष्टीनें फार प्रशंसनीय होती असें श्री. सुराणाहि म्हणणार नाहीं. ब्राह्मणसमाजाचे आधुनिक आद्यप्रतिनिधि म्हणून ओळखले जाऊं शकणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें या प्रश्नावरचें लिखाण पाहिलें कीं ब्राह्मणेतर समाजाला ब्राह्मणसमाजाच्या सद्हेतुबद्दल वाटणारा अविश्वास सहज समजूं शकतो.[४] आजचे कांहीं सुशिक्षित ब्राह्मण

४. पहाः "ब्राह्मणांचें वर्चस्व सहन न होऊन त्यांस विरोध करणारी प्रतिपक्षी मंडळी आजपर्यंत इतकी निर्माण झाली. इतक्यांसहि दाद न देतां आजपर्यंत ब्राह्मण हे या देशांत प्रमुखचे प्रमुख राहिलेच आहेत."
—निबंधमाला, पा. ११५३.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

विष्णुशास्त्री यांचीं मतें मान्य करणार नाहींत, हें मला माहीत आहे. परंतु शतकानुशतकें आलेल्या कटु अनुभवांच्या स्मृती केवळ शब्दानें पुसून काढणें कठीण आहे. त्याकरितां प्रायश्चित्त म्हणून नव्हे तर स्वतःच्या हेतूच्या प्रामाणिकपणाची खूण म्हणून कृतीची आवश्यकता आहे. ब्राह्मणांनीं सत्तासंन्यास घेऊनहि बहुसंख्य ब्राह्मणेतरांपासून त्यांचा वेगळा असा सामाजिक व सांस्कृतिक सवतासुभा कायम राहिला तर महाराष्ट्रांत एकसंध समाज निर्माण करण्याच्या दृष्टीनें अनिष्ट ठरण्याचा संभव अधिक आहे. आज गरज आहे ती ब्राह्मणांनीं तात्पुरता किंवा कायमचा संन्यास घेण्याची नसून ब्राह्मण–ब्राह्मणेतर, स्पृश्यास्पृश्य, हिंदु–अहिंदु –या द्वंद्वांच्या घटकांमधला सांस्कृतिक आणि सामाजिक व्यवहारांतला दुरावा नाहींसा करण्याची. याचा अर्थ पुढारलेल्या जातींची सांस्कृतिक पातळी खालावली पाहिजे असा होण्याचें कारण नाही, परंतु कर्मकाण्ड, रोटीबेटी व्यवहार, भक्ष्याभक्ष्य विधिनिषेध, इत्यादि अनेक यांत्रिक ‘ नीतिनियमां ’चें डोळसपणें पुनःपरीक्षण करून त्या अनुसार स्वतःची वैयक्तिक आणि सामाजिक वागणूक बदलण्याची आवश्यकता आहे. आणि या कार्यांत पुढारलेल्या जातींची जबाबदारी फार मोठी आहे, ब्राह्मण जातीची सर्वांत अधिक आहे.

ब्राह्मणांच्या जबाबदारीवर भर देण्याचें कारण असें कीं कायदा सांगतो तेवढीच आपली जबाबदारी आहे असें समजून लोकशाही निर्माण करतां येत नाहीं. ‘ वृद्धा नारी पतिव्रता ’ म्हणून वैराग्य स्वीकारूनहि भागत नाहीं; आणि आमच्या पूर्वजांनीं केलेले अन्याय त्या काळच्या समाजव्यवस्थेंत स्वाभाविक होते, कारण कीं “ आतांपर्यंत ‘ बळी तो कान पिळी ’ हा न्याय सर्वत्र होता ” असें सांगूनहि स्वतःची जबाबदारी टाळतां येत नाहीं. कारण असें कीं याच न्यायानें ब्राह्मणेतरांनीं ब्राह्मणांवर सूड उगविला तर त्यांना दोष देतां येणार नाहीं. आजची समाजव्यवस्थाच अशी आहे कीं ते मुळांत दुष्ट नसले तरी ब्राह्मणेतरांना संघटित होऊन ब्राह्मणांचे कान पिळण्याची मोकळीक देत आहे. आजचीं मूल्यें वेगळीं आहेत म्हणून या निष्कर्षामधून पळवाट काढतां येणार नाहीं; कारण कीं चार्वाकापासून तरी या देशांत आधुनिक मानवी मूल्यें कोणीना कोणीतरी अधूनमधून पुरस्कारलेलीं आहेत. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या काळांत तर जातिव्यवस्थेंत अभिप्रेत असलेल्या अन्यायांना पंडिती किंवा तात्त्विक बैठक देण्याचें कांहींच कारण नव्हतें. ब्राह्मणांच्या आजच्या पिढीस अभय पाहिजे असेल तर तें मार्क्सवादी भूमिकेवरून देतां येत नाहीं, असें अभय एकाच भूमिकेवरून देतां येईल; आणि ती भूमिका अशी कीं पितरांनीं केवळ पापें केलीं असलीं तरीहि “ पितरांच्या पापांकरितां मुलांना शिक्षा देणें लोकशाही मूल्यांना धरून होणार नाहीं. ”

स्पृश्य ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांच्याबद्दल जशी शंका वाटते तशी अस्पृश्य समाजालाहि सर्वच स्पृश्य समाजाबद्दल वाटत आहे. ही शंका दूर होईपर्यंत रिपब्लिकन पक्षास श्री. सुराणा यांनीं केलेल्या सूचना कितीहि चांगल्या असल्या तरी त्या मान्य होण्याचा संभव कमी आहे. केवळ अल्पसंख्य नसून अनेकदृष्टीनें वंचित असलेली अल्पसंख्य जमात बहुसंख्य समाजावर विश्वास टाकूं शकेल अशी परिस्थिति निर्माण होत नाहीं तोपर्यंत तिला संधिसाधु राजकारणाचा दोष टाळतां येणें अशक्य आहे. आणि रिपब्लिकन पक्षाच्या संधिसाधुपणाला त्याचाशी तडजोड करणारे इतर ‘ हतबल ’ पक्ष अधिक जबाबदार नाहींत का? महाराष्ट्रांत एकहि पक्ष, एकहि पक्षनेता अस्पृश्यता निवारणास लोकशाही निर्मितीच्या कार्याचें अतिशय महत्त्वाचें अंग समजून

“ सरतेशेवटीं आकाशांतील प्रभूस ब्राह्मणेतर वर्णांची कींव येऊन त्यानें या भरतखंडाचें राज्य आपल्या लाडक्या लोकांस बहाल केल्यामुळे त्याच्या प्रसादानें ‘ लोकहितवादी ’, ‘ गुलामगिरी ’कार, ‘ सत्यदीपिका ’धारी असे आज नव ब्रह्मनिष्ठ उदयास येऊन त्यांनीं हें कितीक काळाचें ब्राह्मणांचें बंड मोडून तें ‘ पुरंदरच्या बंडा ’च्या भेटीला पाठवण्याचा स्तुत्य उद्योग सुरू केला आहे ! ”— किता, पा. ११७६.

“ पहिल्यानें उच्चनीच भाव मुळींच नसतां ब्राह्मणांची जर त्यांच्या गुणावरून जाति बांधली असेल, तर त्यांनीं आपलें प्रस्थ माजवलें असें म्हणण्यास जागा कोठें राहिली ”— किता, पा. ११७९.

...... “ चवथा जो मंद बुद्धि शूद्र वर्ण ...... ”— किता, ११८७. (जाड ठसा माझा)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आपल्या सर्व शक्ती त्या कार्यासाठीं पणास लावण्यास अजून निघाला नाहीं, हें खरोखर लज्जास्पद आहे. आर्थिक नियोजनाच्या प्रश्नावर जसे सर्व लोकशाहीपक्ष कांहीं किमान संकेत पाळण्याचें कबूल करतात तसें लोकशिक्षण, अस्पृश्यता निवारण, अशा पक्षीय राजकारणाच्या पलीकडे परंतु लोकशाहीच्या राजकारणासाठीं अद्वितीय महत्त्वाच्या प्रश्नावर त्यांनीं सहकार्य कां करूं नये ? आणि असें होत नाहीं तोपर्यंत मागासलेल्या जातींच्या संघटनांवर दोषारोष करणें कितपत योग्य होईल ?

प्राज्ञपाठशाळा मण्डळ-ग्रन्थ प्रकाशन

वैदिक संस्कृतीचा विकास

लेखक– तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,

वैदिक संस्कृतीचें विकसित रूप म्हणजेच आजची भारतीय संस्कृती होय. भारतीय संस्कृतीच्या जन्मापासून आतांपर्यंत झालेल्या स्वरूपाचें वर्णन या पुस्तकांत प्राधान्यानें केलें आहे. वैदिक संस्कृतीच्या अभ्यासकास अत्यंत उपयोगी आणि मराठी भाषेंतील अत्यंत अप्रतिम अशा प्रकारचें हें पुस्तक आहे.

किंमत ६ रु.

प्रकाशक : व्यवस्थापक प्राज्ञपाठशाळामंडळ
वाई (जि० उ. सातारा)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका